# १ अजाण आम्ही तुझी लेकरे

अजाण आम्ही तुझी लेकरे
तू सर्वांचा पिता
नेमाने तुज नमितो, गातो
तुझ्या गुणांच्या कथा ।।१।।



सूर्य-चंद्र हे तुझेच देवा
तुझी गुरे वासरे
तुझीच शेते, सागर, डोंगर,
फळे, फुले, पाखरे ।।२।।

अनेक नावे तुला,
तुझी रे दहा दिशांना घरं
करिसी देवा सारखीच तू
माया सगळ्यांवर ।।३।।

खूप शिकावे, काम करावे,
प्रेम धरावे मनी
हौस एवढी पुरवी देवा
हीच एक मागणी ।।४।।

## शब्दार्थ

अजाण – निष्पाप, निरागस (Innocent)
लेकरे – मुले/बाळे (Children)
नेमाने – दररोज/नियमित (Regularly)
नमितो – नमस्कार करतो (Praying)
हौस – इच्छा (Wish)
माया – प्रेम (Love, Affection)
पुरवी – पूर्ण करणे (Complete, Absolute)



## अभ्यास

**(अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. (Fill in the blanks.)**

१. नेमाने तुज .................................................. गातो, तुझ्या गुणांच्या कथा.

२. .................................................. हे तुझेच देवा तुझी गुरे वासरे.

३. अनेक नावे तुला, तुझी रे .................................................. घर.

४. .................................................. एवढी पुरवी देवा हीच एक मागणी.

**(आ) एका वाक्यात उत्तरे दया. (Answer in one sentence.)**

१. देवाची लेकरे कशी आहेत?

..................................................................................................................................

२. देवाचे घर कुठे आहे?

..................................................................................................................................

३. देव सगळ्यांवर काय करतो?

..................................................................................................................................

४. कवीची देवाकडे कोणती मागणी आहे?

..................................................................................................................................

## ( इ ) समानार्थी शब्द शोधा. (Search and write the similar word.)

दररोज रवि प्रेम लेकरे शशि सुमन

| | |
|---|---|
| १. माया – ........ | ४. चंद्र – ........ |
| २. सूर्य – ........ | ५. नियमित – ........ |
| ३. फूल – ........ | ६. मुले – ........ |

## ( ई ) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. (Write the answer in two-three sentences.)

१. कवितेतील कोण-कोणत्या गोष्टी देवाच्याच आहेत?

........

........

२. देवाने कवीची कोणती मागणी पूर्ण करावी?

........

........

........

३. कवीच्या मते देव सगळ्यांवर सारखीच माया करतो, म्हणजे काय?

........


........


........

२

# नवीन घर

एका जंगलाच्या काठावर सुंदर असे तळे होते. त्यात सर्व पशु-पक्षी पाणी पित असत. पाण्यात राहणारे प्राणीही आनंदाने एकमेकांसोबत राहत असत. तेथेच एका बगळ्याचा परिवार आपल्या बेडूक मित्रांसह राहत होता. त्या बगळ्याची आणि बेडकाची खूप चांगली मैत्री होती. ते सर्व एका परिवाराप्रमाणे राहत होते. बगळ्याला त्याचे शेजारी फार आवडत असते आणि तो शेजाऱ्यांना नेहमीच मदत करीत असे. एका उन्हाळ्यात इतके कडक ऊन होते की बगळा राहत असलेले तळेपण आटू लागले. बगळा आपल्या परिवारासह जवळच्याच दुसऱ्या तळ्यात रहायला गेला. परंतु बगळयाच्या मनात बेडकांबद्दल चिंता होती, ''सगळे बेडूक कसे जगत असतील?'' त्याने विचार केला.





एक आठवडा गेला तरीही पाऊस पडला नाही. बेडकांची काळजी वाटू लागल्याने बगळा उडत-उडत आधीच्या तळ्याकडे गेला. तळ्यात अगदी थोडेच पाणी शिल्लक होते. अनेक बेडूक मरणाला लागले होते आणि नवीन तळे तसे दूरच होते.

बगळ्याला एक कल्पना सुचली. तो बेडकांना म्हणाला, ''मी एकेकाला माझ्या चोचीतून दुसऱ्या तळ्यात घेऊन जाईन. आपण सगळे त्या तळ्यात सहज राहू शकतो. बेडकांनी होकार दिला. बगळ्याने एकेक करून सगळ्या बेडकांना आपल्या चोचीतून नवीन तळ्यात नेले. इतर बगळ्यांनी सुध्दा मदत केली आणि लवकरच सगळे बेडूक आणि बगळे पूर्वी प्रमाणेच एका परिवारासारखे सुखाने जगू लागले.

तात्पर्य : संकटकाळी इतरांना मदत करावी.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| परिवार - कुटुंब (Family) | मैत्री - दोस्ती (Friendship) |
| शिल्लक - बाकी (Remain) | चिंता - काळजी (Anxiety) |
| कल्पना - युक्ती/विचार (Idea) | मदत - सहाय्य (Help) |
| जंगल - वन (Forest) | सुंदर - छान, सुरेख (Beautiful) |
| पाणी - जल (Water) | |



## अभ्यास

**(अ) एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा.**
**(Write the answer in one-two sentences.)**

१. बगळ्याचा परिवार कोणासोबत राहत होता?

२. बगळा आपल्या परिवाराला घेऊन कुठे गेला?

३. बगळ्याला बेडकांची काळजी का वाटू लागली?

४. बगळ्याला कोणती कल्पना सुचली?

.......................................................................................................

.......................................................................................................

## ( आ ) योग्य जोड्या जुळवा. (Match the following.)

| | |
|---|---|
| बगळा | ऊन |
| तळे | उडी |
| बेडूक | पाणी |
| उन्हाळा | पक्षी |

## ( इ ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. (Fill in the blanks.)

१. एका .............................................. इतके कडक ऊन होते की बगळा राहत असलेले .............................................. आटू लागले.

२. बगळ्याच्या मनात बेडकांबद्दल .............................................. होती.

३. एक आठवडा गेला तरीही .............................................. पडला नाही.

४. बगळ्याला एक .............................................. सुचली.

## ( ई ) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. (Write the answer in two-three sentences.)

१. जंगलातील पशु-पक्षी एकमेकांसोबत कशाप्रकारे राहत असत?

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

२. उन्हाळ्यातील उन्हामुळे जंगलात कोणती परिस्थिती निर्माण झाली?

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

३. बदक आणि बेडूक यांच्यातील मैत्री कशी होती?

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

४. बेडकांच्या रक्षणासाठी, बगळ्याने कोणती कल्पना अमलात आणली?

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

## (उ) विरुद्धार्थी शब्द लिहा. (Write opposite words.)

| | |
|---|---|
| सुंदर × .................... | मैत्री × .................... |
| एक × .................... | ऊन × .................... |
| सुख × .................... | छोटा × .................... |
| कडक × .................... | नवीन × .................... |
| आनंद × .................... | खूप × .................... |

३

# ब्राह्मण आणि भामटे




एक ब्राह्मण होता. तो गावातील सर्व पूजा-विधी, धर्मकार्य करायचा आणि दान-दक्षिणा घ्यायचा. असाच एकदा तो एका धर्मकार्याचा विधी पूर्ण करून आपल्या घरी चालला होता. त्या कार्याच्या यजमानाने त्याला कपडे दिले, दक्षिणा दिली, शिवाय एक कोकरूही दिले होते. ते कोकरू ब्राह्मण खांद्यावर घेऊन आपल्या घराकडे निघाला.

त्याला रस्त्यात तीन भामट्यांनी पाहिले ते आपापसात म्हणाले. ''कसेही करून हे कोवळे कोकरू आपण मिळवले पाहिजे.''

तिघांनी योजना बनवली, ते त्या रस्त्यावर थोड्या-थोड्या अंतरावर जाऊन उभे राहिले. पहिला भामटा जवळ येऊन म्हणाला, ''भटजीबुवा, हे कुत्रे खांद्यावर का बरे घेतले आहे? आजारी आहे की काय?''

ब्राह्मण म्हणाला, ''अरे, हे कुत्रे नसून कोकरू आहे. मला यजमानाने दिले आहे.''



थोड्या अंतरावर दुसरा भामटा भेटला. तो म्हणाला, ''एकीकडे तुम्ही स्वच्छ व पवित्र दिसता आणि दुसरीकडे घाणेरड्या कुत्र्याला खांद्यावर घेता, हे कसे वागणे आहे भटजी बुवा?''


ब्राह्मणाने कोकरू खाली ठेवले आणि म्हणाला, "अहो, हा कुत्रा नाही. नीट पहा, हे कोकरू आहे."

भामटा जोराने म्हणाला, ''तुम्हीच नीट पहा. तुमचे डोळे तरी बिघडले आहेत किंवा डोके तरी फिरले आहे.''

थोडे अजून अंतर गेल्यावर ब्राह्मणाला तिसरा भामटा भेटला. तो म्हणाला, ''कुत्रा कितीही लाडका असला तरी त्याला कोणी खांद्यावर घेत नाही. ब्राह्मणाने तर असे कधीच करू नये.''

एका पाठोपाठ तिघांनी कुत्रे आहे म्हटल्यामुळे ब्राह्मण घाबरला. त्याला वाटले, कोण जाणे काय आहे. ही भुताटकी तर नसेल? कोकरू असो की कुत्रे असो, मला ते मुळीच नको. असे म्हणून त्याने ते कोकरू तिथेच ठेवले आणि तो घराकडे धूम पळाला.

भामट्यांना हेच हवे होते. त्यांनी ते कोकरू उचलले आणि आपल्या घरी नेले.



ब्राह्मणाने स्वतः नीट विचार न करता इतरांचे ऐकले आणि सर्वजण तेच सांगत आहेत म्हणून ते खरे मानले त्यामुळे त्याचेच नुकसान झाले.

**तात्पर्य :** ऐकावे जनाचे करावे मनाचे.

## शब्दार्थ

विधी - पुजेचा कार्यक्रम (Rituals)

यजमान - पाहुणचार करणारा (Host)

कोकरू - बकरी/शेळीचे पिल्लू (Lamb)

भामटे - लबाड (Liar, Crook)

पवित्र - शुद्ध, निर्मळ (Holy)

आजारी - रोगी (Ill, Sick)

रस्ता - मार्ग, वाट (Way)

डोळे - नेत्र, नयन (Eyes)

लाडका - आवडता (Dear)

नीट - व्यवस्थित (Neat, Orderly)

# अभ्यास

## ( अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा. (Answer in one sentence.)

१. ब्राह्मण काय करायचा?

२. ब्राह्मण कोणते कार्य पूर्ण करून घरी निघाला होता?

३. ब्राह्मणाने खांद्यावर काय घेतले होते?

४. ब्राह्मणाला रस्त्यात कोण भेटले?

## ( आ ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. (Fill in the blanks.)

१. हा कुत्रा नाही. नीट पहा, हे .................... आहे.

२. कुत्रा कितीही .................... असला तरी त्याला कोणी खांद्यावर घेत नाही.

३. भटजीबुवा, हे .................... खांद्यावर का बरे घेतलं आहे.

## ( इ ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.
(Write the opposite word.)

स्वच्छ × ..........

जोराने × ..........

नियमित × ..........

भामटा × ..........

खरे × ..........

खाली × ..........

## ( ई ) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.
(Write the answer in two-three sentences.)

१. धर्मकार्य करणाऱ्या यजमानाने ब्राम्हणाला दक्षिणा म्हणून काय-काय दिले?

..........

..........

..........

२. दुसरा भामटा ब्राम्हणाला काय म्हणत होता?

..........

..........

..........

३. ब्राम्हण धूम ठोकून घराकडे का पळाला?

..........

..........

..........